NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# भारताचे कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन : एक चिकित्सक अभ्यास

**वर्षा प्रकाश आसबे,** संशोधक विद्यार्थिनी,राज्यशास्त्र अधिविभाग,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
Email – varshasawant3151991@gmail.com

---

**प्रास्ताविक :-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर कोणत्याही राष्ट्राचा लष्करी इतिहास पाहता असे दिसते की, युद्ध जिंकण्यासाठी प्रत्येक राष्ट्र वेगवेगळी युद्धनीती आणि डावपेचाचा वापर करीत असते. ही युद्धनीती किंवा डावपेच संबंधित राष्ट्रातील पंतप्रधान, केंद्रीय मंत्रिमंडळाची संरक्षण समिती, सेनाप्रमुख आणि संरक्षण मंत्री ठरवित असतात. या धोरणाचा आणि त्यातून सुरू केलेल्या कृतीचा मुख्य उद्देश स्वराष्ट्राचे कमीतकमी नुकसान व अधिकाधिक फायदा हा असतो. त्याला जोडून आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा जोपासण्याचा किंवा उंचावण्याचा प्रयत्न केला जातो. यासंदर्भात भारताच्या सुरक्षा धोरणात आणि विभागीय पातळीवरील भूराजकीय बदलांनुसार सैन्याच्या युद्धनीतीमध्ये प्रचंड बदल होत आहेत. विशेषतः भारत - पाकिस्तानच्या सीमेवरील आव्हाने आणि युद्धाच्या बदलत्या स्वरूपामुळे भारताला आपल्या सैन्य क्षमतेचा आणि कारवाईच्या वेगाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यास अनुसरून २००१ च्या संसदेवरील हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने 'कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन' विकसित केली. ती आता 'कोल्ड स्ट्राईक' या अधिक वेगवान, गुप्तचर आधारित आणि एकीकृत युद्धनीतीकडे वाटचाल करत आहे. या बदलाचा उद्देश शत्रूला प्रत्युत्तर देण्यासाठी लागणारा वेळ कमी करणे, सैनिकी तुकड्यांची लवचिकता वाढवणे आणि कमी वेळेत, कमीतकमी साधनसंपत्ती वापरून निर्णायक विजय मिळवणे हा आहे.

बदलत्या काळाप्रमाणे युद्ध पद्धतीमध्येही बदल होत असतात. सद्य काळात इतिहासातील लढायांप्रमाणे हातात तलवारी घेऊन युद्धे होत नाहीत. आजचा काळ विज्ञान-तंत्रज्ञानाचा आहे. त्यामुळे युद्धनीतीमध्ये बदल करणे ही प्रत्येक राष्ट्राची गरज ठरते. तर जगभरातील सर्वच राष्ट्रे ही गरज पूर्ण करण्यासाठी आज यथाशक्ती प्रयत्न करत आहेत. भारताच्या संदर्भात विचारकरता, सातत्याने युद्धनीतीबाबत परिवर्तनीय दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन' ते 'कोल्ड स्ट्राईक'पर्यंतची भारताची वाटचाल होय. या धोरणाचा सैन्याच्या सामर्थ्यावर व राष्ट्रीय सुरक्षेवर कसा प्रभाव पडतो, हे अभ्यासण्याच्या हेतूने प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**कीवर्ड :-** Cold start doctrine, युद्धनिति, दहशतवाद.

**संशोधन लेखाची उद्दिष्ट्ये :–**

१. Cold start doctrine अभ्यासणे.

२. सद्यकाळातील भारताच्या बदलत्या युद्ध पद्धतींचा अभ्यास करणे.

३. Cold start doctrine च्या परिणामांचा अभ्यास करणे

**पार्श्वभूमी :-**

भारतीय युद्धकला व युद्ध नितीबद्दलच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीची चर्चा करता असे दिसते की, प्राचीन काळापासून सद्य काळापर्यंत अनेक युद्ध झाली. उदा. झेलमची लढाई, पानिपतचे युद्ध, ब्रिटिशांबरोबर झालेला संघर्ष, स्वतंत्र काश्मीरसाठी झालेले युद्ध, स्वातंत्र्योत्तर काळातील भारत - चीन युद्ध आणि भारत - पाकिस्तान युद्ध इत्यादी होय. त्याचा विशिष्ट प्रभाव भारतावर झाला. या सर्व संघर्षापैकी एकटया पाकिस्तान विरोधात स्वातंत्र्यानंतर चार प्रत्यक्ष युद्धे लढली आहेत. पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय यांनी १९८८-८९ पासून जम्मू - काश्मीर आणि इतरत्र लष्कर-ए-तैयब्बा आणि जैश-ए-मोहम्मद या सारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांच्या माध्यमातून भारताविरुद्ध कायम प्रॉक्सी युद्ध करीत आहे. अलीकडच्या काळात म्हणजे १३ डिसेंबर २००१ मध्ये भारतीय संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन पराक्रम' अंतर्गत पाकिस्तानच्या सीमेवर मोठ्या प्रमाणात सैन्य जमविले. परंतु या सैन्य जमविण्याच्या प्रक्रियेला एक महिन्यापेक्षा जास्त काळ लागला. हा कालावधी जास्त असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरून हस्तक्षेप होण्याची शक्यता वाढली. तसेच पाकिस्तानलाही आपली बचाव यंत्रणा सज्ज करण्याची संधी मिळाली किंवा वेळ मिळाला. या अनुभवातूनच 'कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन'चा उदय झाला.

**'कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन' :-**

**धोरण व कृती -**

'कोल्ड स्टार्ट डॉक्ट्रिन' अर्थात 'सीडीएस' म्हणजे पाकिस्तान हल्ला करणार हे गृहीत धरून मोठ्या सैन्य तुकड्यांना एकत्र आणण्याऐवजी छोट्या, स्वयंपूर्ण व एकत्रित लढाऊ गटांचा वापर करून वेगवान आणि अचूक हल्ला करणे होय. या धोरणाचा उद्देश पाकिस्तानला त्वरित मोठे नुकसान पोहोचवणे हा होता. 'सीडीएस'ने कारवाईचा वेळ कमी केला असला तरीही पूर्ण ताकदीने हल्ला चढवण्यासाठी काही दिवसांचा वेळ आवश्यक असतो. भारतात मोठ्या प्रमाणावर असलेल्या पारंपरिक सैन्याच्या संरचनेत आवश्यक वेग आणि लवचिकता आणणे हेसुद्धा एक आव्हान होते. तसेच कोणत्याही मोठ्या कारवाईत आंतरराष्ट्रीय दबाव आणि मध्यस्थीची शक्यता कायम राहते.

'कोल्ड स्ट्राईक' हे धोरण 'कोल्ड स्टार्ट'च्या मूळ तत्त्वज्ञानाला अधिक धारदार, वेगवान आणि तंत्रज्ञान आधारित बनवते. हे धोरण आधुनिक युद्धाच्या मागण्या पूर्ण करते. तर हे धोरण यशस्वी होण्यासाठी अचूक गुप्त माहिती, त्वरित कारवाई करण्याची क्षमता आणि एकीकृत शस्त्रप्रणाली निर्णायक ठरते.

**भारतीय युद्धनितीतील नवे बदल –**

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतीय सैन्याने आपल्या संरचनेत अनेक बदल केले. त्यापैकी सर्वात महत्वाचा व मोठा बदल म्हणजे, 'रुद्र ऑल आर्म्स ब्रिगेड'ची निर्मिती आणि त्यांचा 'त्रिशूल' यासारख्या युद्धसरावात केलेला वापर होय. या ब्रिगेडमध्ये चिलखती युनिटस्, तोफखाना, विशेष दल, इंजिनिअर्स, सिग्नल युनिटस् आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवरहित हवाई प्रणाली यांचा समावेश करण्यात आला आहे. पारंपरिक युद्धात वेगवेगळ्या विभागांमध्ये समन्वय साधण्यात वेळ आणि ऊर्जा खर्च होत होती. 'रुद्र ब्रिगेड'मध्ये सर्व विभाग कायमस्वरूपी एकत्र असल्याने निर्णय क्षमता आणि कारवाईचा वेग वाढतो आहे. ब्रिगेड कमांडरला त्याच्या गरजेनुसार सर्व आवश्यक संसाधने एकाच वेळी उपलब्ध आहेत. यामुळे त्याला तत्काळ परिस्थितीनुसार प्रतिसाद देणे किंवा प्रतिहल्ला करणे सहजपणे शक्य होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या ब्रिगेडना विशिष्ट भौगोलिक प्रदेशानुसार प्रशिक्षित केले आहे. भारत-पाकिस्तान सीमेवरील वाळवंटी प्रदेशासाठी विशेषतः जलद हालचालींवर लक्ष केंद्रित करणे, भारत-चीन सीमेवरील उंच पर्वतांसाठी हलका तोफखाना, विशेष पर्वतारोहण तुकड्या आणि ड्रोन यांचा प्रभावी वापर करणे, पंजाब सीमेवरील मैदानी प्रदेशांसाठी टॅन्स, पायदळ आणि हवाई सहकार्याचा प्रभावी समन्वय साधणे याद्वारे ही ब्रिगेड अधिक सामर्थ्यशाली बनवण्यात येत आहे.

कोल्ड स्ट्राईक धोरणाची कक्षा पाहता, भारतीय सैन्य २५० हून अधिक 'सिंगल आर्म्स ब्रिगेड'चे रूपांतर 'ऑल आर्म्स रुद्र ब्रिगेड'मध्ये करत आहे. वेगवान, विशिष्ट मिशनसाठी 'भैरव बटालियन' या लहान; पण विशेष मोहीम दलाची स्थापना २०२५ मध्ये करण्यात आली आहे. याची प्रातिनिधिक संरचना सुमारे २५० जवानांची असून, ते पारंपरिक इन्फंट्री आणि स्पेशल फोर्सेस यांच्या मधले अंतर भरून काढण्याचे काम करते. जलद रणनीतिक छापे, सीमावर्ती ऑपरेशन्स, सर्जिकल स्ट्राईक्स, ड्रोनद्वारे निगराणी आणि लक्ष्य निश्चिती हे या दलाचे प्रमुख कार्य आहे. तर या बटालियनचे प्रशिक्षण जमीन, आकाश, समुद्र व अंतराळ अश्या अनेक क्षेत्रामध्ये समन्वय साधून दिले जाते. तसेच ते ड्रोन आधारित युद्धावर केंद्रित करण्यात आले आहे.

**'कोल्ड स्ट्राईक' धोरणाचे आधार -**

भारताच्या कोल्ड स्ट्राइक नीतीचा विचार करता बहुक्षेत्रिय समन्वय, इंटेलिजन्स फ्युजन आणि आधुनिक युद्ध पद्धती हे तीन प्रमुख आधार आहेत. आज मोठ्या प्रमाणावर सैन्यबळ वापरण्याऐवजी गुप्तचर माहितीच्या आधारावर हल्ले करणे अपेक्षित आहे, यामध्ये काही महत्त्वपूर्ण गोष्टींचा समावेश होतो. ते म्हणजे ड्रोन, उपग्रह आणि मानवी गुप्तहेर यांच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीच्या आधारावर शत्रूंच्या हालचालीवर त्वरित आणि सतत लक्ष ठेवणे. दुसरे म्हणजे अचूक लक्ष निश्चित करून कमीतकमी नुकसान होईल किंवा ते कसे टाळता येईल हे पाहणे, याशिवाय सध्याच्या सायबर आणि इलेक्ट्रॉनिक युद्धांच्या काळात शत्रूंची संपर्क साधने निकामी करणे आणि त्यांच्या निर्माण प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण करणे ज्यामुळे कारवाई अधिक वेगवान होणे शक्य होते. एकूणच बहुस्तरीय समन्वय, इंटेलिजन्स फ्युजन आणि आधुनिक युद्ध पद्धती हे कोल्ड स्ट्राइक नीतीचे आधार दिसतात. तर त्यामुळे भारतीय सैन्यव्यवस्था अधिक मजबूत व सक्षम होत आहे.

'कोल्ड स्ट्राईक' धोरणाचा मुख्य उद्देश जलदगतीने हल्ला करणे हा आहे. जमिनीवरून अग्निशक्ती - लांब पल्ल्याच्या मध्यम तोफा, रॉकेट लाँचर आणि जमिनीवरून जमिनीवर आणि क्रूझ क्षेपणास्त्रांद्वारे तसेच मोठ्या प्रमाणात हवेतून जमिनीवर रणांगणातील हवाई हल्ल्यांद्वारे पाकिस्तानी सैन्याच्या युद्ध क्षमतेचा नाश करणे हा 'कोल्ड स्ट्राईक'

धोरणाचा दुसरा उद्देश आहे. या दोन्ही उद्देश पूर्तीसाठी ही ब्रिगेड कायमस्वरूपी युद्ध सज्ज अवस्थेत तैनात असते. गुप्तचर विभागास माहिती मिळाल्यानंतर 'रुद्र ब्रिगेड'ला हालचाल करण्यासाठी काही तासांचा अवधी पुरेसा आहे. जेव्हा शत्रूला हे माहीत असते की, प्रत्युत्तर देण्यास भारताला जास्त वेळ लागणार नाही आणि त्यांच्या प्रतिहल्ल्याचे स्वरूप अधिक विनाशकारी असेल, तेव्हा तो कोणतेही गैरकृत्य करण्यापूर्वी वारंवार विचार करेल. 'कोल्ड स्ट्राईक' धोरण पाकिस्तानच्या 'प्रॉक्सी वॉर' आणि दहशतवादी कारवायांना त्वरित आणि निर्णायक प्रतिसाद देण्याची क्षमता ठेवते. 'कोल्ड स्ट्राईक' धोरण पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यासाठी प्रवृत्त न करता त्याचे लक्षणीय नुकसान करण्यासाठी आखली आहे. 'रुद्र ब्रिगेड'ची भौगोलिक लवचिकता केवळ पाकिस्तान सीमेपुरतीच मर्यादित नसून, भारत-चीन सीमेवरील डोंगराळ प्रदेशातही तितकीच उपयुक्त आहे. चीनसोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सैन्याला त्वरित तैनात करण्याची आणि युद्ध करण्याची या ब्रिगेडची क्षमता भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

**आव्हाने :-**

कोल्ड स्ट्राईक धोरणापुढील सर्वांत मोठे आव्हान म्हणजे मानवी संसाधनांचे प्रशिक्षण हे होय. सध्याचा नवीन 'ऑल आर्म्स' संरचनेत काम करण्यासाठी जवानांना आणि अधिकाऱ्यांना उच्चस्तरीय, बहुआयामी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर क्षमतांना पारंपरिक युनिट्सबरोबर अखंडपणे जोडणे किंवा या दोहोंमध्ये समन्वय साधने हे सध्या कोल्ड स्ट्राईक धोरणापुढील मोठे तांत्रिक आणि व्यवस्थापकीय आव्हान बनत आहे. तर या बदलांसाठी प्रचंड आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता आहे. विशेषतः आधुनिक उपकरणे आणि शस्त्र प्रणालींसाठी याची आवश्यकता आहे. याशिवाय हे धोरण पूर्णपणे गुप्त माहितीवर अवलंबून असल्याने त्या माहितीची अचूकता आणि त्याची विश्वसनियता अत्यंत महत्त्वाची आहे.

**मूल्यमापन :-**

भारताच्या युद्धनीतीतील प्रमुख बदल, जागतिक पातळीवरही महत्त्वाचा ठरत आहेत. भारत सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आघाडीवर आहे. भारतीय सैन्याची 'कोल्ड स्टार्ट'पासून 'कोल्ड स्ट्राईक'कडे झालेली वाटचाल केवळ युद्धनीतीतील बदल नाही, तर आधुनिक भारताच्या सुरक्षा संकल्पनेतील एक मूलभूत परिवर्तन आहे. तर 'रुद्र ऑल आर्म्स ब्रिगेड' हे या परिवर्तनाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. हे नवे धोरण केवळ युद्ध करण्याची पद्धत बदलत नाही, तर प्रादेशिक सुरक्षेच्या समतोलावरही दूरगामी परिणाम करीत आहे. तसेच हे नवे धोरण भारताला भविष्यातील सुरक्षेसंदर्भातील विवध आव्हानांसाठी अधिक सज्ज असून ते अधिक वेगवान आणि निर्णायक बनवेल. यामुळे भारताची विभागीय महाशक्ती म्हणून असलेली भूमिका अधिकाधिक मजबूत होईल, असा निष्कर्ष काढता येतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**

1. Mishra N. B., Cold Start Doctrine and Future India's New War Strategies, 2016.
2. Joshi Yogesh, The Cold End of Cold Start Doctrine?, The Institute of Peace and Conflict Studies, 13 October 2010.
3. Gurmeet Kanwal, 'India's Cold Start Doctrine and Strategic Stability,' IDSA Strategic Comments, 1 June 2010.
4. Sastry Shiva, Operation Sindoor - How Pakistan Was Brought To Its Knees In 88 Hours, Subbu Publisher, December 2024.
5. ब्रिगेडियर महाजन हेमंत., पाकिस्तानच्या विरोधात भारताची रणनीती, दै. मुंबई तरुण भारत, 30 नोव्हेंबर 2025.